## मातृभाषा : मराठी

अ : मराठी

घटक ६ ...२१

# एका शब्दाचे अनेक अर्थ

# एका शब्दाचे अनेक अर्थ

एखाद्या शब्दाचे वेगवेगळे अर्थ असू शकतात.

उदाहरणार्थ :

माळ, वाट, तीर, नाव इत्यादी. संपूर्ण वाक्य लक्षात घेतले असता त्या शब्दाचे वेगवेगळे अर्थ समजू शकतात.

उदा.

- ✓ घंटेचा नाद ऐकताच मुले वर्गात पळाली.

  ( नाद – आवाज )

- ✓ रवींद्रला चित्रकलेचा नाद आहे.

  ( नाद – छंद )

खाली काही शब्दांचे दोन-दोन अर्थ दिले आहेत. त्यांचा अभ्यास करा.

अनंत : अमर्याद

आकाश

अभंग : न फुटलेला

काव्यरचनेचा एक प्रकार

अरी : शत्रू

चांभाराचे शिवण्याचे साधन

अर्थ : पैसा

शब्दाचा अर्थ

अंक : संख्या

मांडी

अंबर : आकाश

वस्त्र

**अढी** : आंबे पिकायला घालणे

पायावर पाय टाकून बसणे

**अक्षर** : पूर्ण उच्चाराचा वर्ण

अविनाशी

आस : इच्छा

गाडीच्या चाकांचा कणा

अंबर : आकाश

वस्त्र

ओढा : मनाची कल

पाण्याचा लहान ओघ

कर : हात

किरण

सरकारी सारा

कळ : चमक

भांडण्याचे कारण

कर्क : एक असाध्य रोग

खेकडा

एक रास

**कर्ण :** त्रिकोणातील काटकोनासमोरील बाजू

कान

महाभारतातील योद्धा

**काळ :** यम

वेळ

कासार : तलाव

बांगड्या भरणारी

कोट : किल्ला

सैन्याचा व्यूह

अंगरख्याचा प्रकार

संख्या

कोळी : मासे पकडणारा

एक किडा

खल : दुष्ट

कुटण्याचे साधन

चर्चा

खाज : फाजील हौस

सुरसुरी

कंड

गाज : लांबी मोजण्याचे एक परिमाण

हत्ती

कांब

ग्रह : मत

आकाशातील गोल

घन : एकाच संख्येचा तीन वेळा गुणाकार

दाट मेघ

**घाट** : डोंगरातील वळणावळणाचा रस्ता

नदीच्या पायऱ्या

**चरण** : कवितेची ओळ

पाय

चाल : हालचाल

चालणे

चपला : वहाणा

वीज

चाळ : घरांची रांग

पैंजण

चाळणे

चिरंजीव : मुलगा

कायम टिकणारा

जलद : ढग

लवकर

जीवन : आयुष्य

पाणी

टकळी : वटवट

सूत काढण्याची चाती

डाव : कारस्थान

कपट

खेळाचा डाव

तट : किनारा

कडा

किल्ल्याची भिंत

तळी : तळाला

तलाव

तीर : काठ

बाण

दल : पान

सैन्य

दर : भाव

प्रत्येक

दर्प : वास

गर्व

दंड : शिक्षा

काठी

बाहू

द्विज : पक्षी

ब्राह्मण

धड : मानेखालचा शरीराचा भाग

न फाटलेले

स्पष्टपणे

नाव : होडी

वस्तूचे नाव

नाद : छंद

आवाज

पय : पाणी

दूध

पर : परका

पीस

पत्र : पान

टपाल

**पण** : प्रतिज्ञा

परंतु

**पाट** : एक आसन

पाण्याचा लहान प्रवाह

पाठ : धडा

पाठांतर

शरीराचा एक अवयव

पात्र : भांडे

नदीचा विस्तार

योग्य

नाटकातील भूमिका

पार : पलीकडे

झाडाभोवतालचा कट्टा

पाव : चौथा हिस्सा

खाण्याचा पदार्थ

पालक : पालन करणारा

एक पालेभाजी

पूर : नगर

पाण्याचा पूर

पक्ष : वादातील बाजू

पंधरवडा

पंख

बळ : शक्ती

सैन्य

वर : पती

आशीर्वाद

भट : भिक्षुक

योद्धा

वाट : रस्ता

दुसऱ्यासाठी थांबणे

भाव : भक्ती

किंमत

वात : वारा

विकार

दिव्याची वात

भेट : नजराणा

भेटणे

वाली : रक्षणकर्ता

एका वानराचे नाव

मकर : सुसर

एक रास

कपट

वारी : पाणी

यात्रा

हार : पराभव

फुलांची माळ

माया : धन

प्रेम

कपडा शिवताना कडेने सोडलेली जागा

वास : सुगंध

वस्ती

मान : मोठेपणा

शरीराचा एक भाग

विभूती : भस्म

ऐश्वर्य

महापुरुष

मात्रा : स्वरांचे कालमापन

औषधाचे प्रमाण

साल : वर्ष

फळावरील वेष्टन

यात्रा : जत्रा

तीर्थस्थान

धार्मिक स्थळांचा प्रवास

सुमन : फूल

चांगले मन

राई : मोहरी

झाडी

# स्वाध्याय १

## खालील प्रश्नांच्या योग्य उत्तराचा क्रमांक चौकटीत लिहा.

प्र. 1

‘ पितांबर ’ या शब्दाचा अर्थ कोणता ?

(1) पिवळे वस्त्र

(2) आकाशी वस्त्र

(3) धोतर

(4) सोवळे

प्र. 2

‘ रघूला गाणी ऐकण्याचा नाद आहे ’ या वाक्यातील ‘ नाद ’ या शब्दाचा अर्थ कोणता ?

(1) सवय

(2) आवाज

(3) छंद

(4) गोडी

प्र. 3

‘ रामरावांनी भरपूर माया जमा केली होती ’ या वाक्यातील ‘माया’ या शब्दाचा अर्थ काय ?

(1) ममता

(2) धन

(3) कपडा शिवताना सोडलेली जागा

(4) तिन्ही बरोबर

प्र. 4

‘ हनुमानास पवनसुत म्हणतात.’ या वाक्यातील ‘ सुत ’ चा अर्थ काय ?

(1) मुलगा

(2) मुलगी

(3) धागा

(4) भक्त

प्र. 5

आईवडिलांचा आपल्या मुलांकडे ओढा असतो. या वाक्यातील ‘ओढा’ या शब्दाचा अर्थ काय ?

(1) ओढणे

(2) मनाचा कल

(3) पाण्याचा लहान ओघ

(4) नदी

प्र. 6

‘ नागपूरला संत्री मिळतात.’ या वाक्यातील ‘ पूर ’ चा अर्थ कोणता ?

(1) खूप पाऊस पडणे

(2) पूर्ण

(3) नगर

(4) पाणलोट

प्र. 7

‘ माझे पोट वातामुळे दुखत आहे.’ या वाक्यातील ‘वात’ चा अर्थ काय ?

(1) वारा

(2) पवन

(3) दिव्याची वात

(4) एक विकार

प्र. 8

छोटा राहूल १ ते ५० अंक चांगले काढतो.
या वाक्यातील ‘अंक’ चा अर्थ काय ?

(1) मांडी

(2) पाढे

(3) संख्या

(4) आकार

प्र. 9

‘ मनापासून कार्य करणा-याला समाजात मान मिळतो.’ या वाक्यात ‘मान’ चा अर्थ काय ?

(1) एक अवयव

(2) मोठेपणा

(3) हार

(4) सत्कार

# घटक ६...२१

# एका शब्दाचे अनेक अर्थ : उत्तर-सूची

## स्वाध्याय क्र.१

(1) 1

(2) 3

(3) 2

(4) 1

(5) 2

(6) 3

(7) 4

(8) 3

(9) 2

# स्वाध्याय २

सूचना...

अधोरेखित असलेल्या शब्दाचा अर्थ पर्यायांतून शोधा.

प्र. 1

महागाईमुळे वस्तूंचे <u>दर</u> सारखे वाढतच आहेत.

(1) प्रत्येक

(2) भाव

(3) संख्या

(4) कर्ज

प्र. 2

हार घालून घ्यावा पण हार पत्करू नये.

(1) पराभव

(2) फुलांचा हार

(3) माळ

(4) अनुभव

प्र. 3

तो <u>तीरासारखा</u> धावला.

(1) किनारा

(2) बाण

(3) वेग

(4) आवेग

प्र. 4

<u>काळ</u> आला होता पण वेळ आली नव्हती.

(1) समय

(2) मृत्यू

(3) जीवन

(4) भांडण

प्र. 5

मांजराला पय आवडते.

(1) पाणी
(2) उंदीर
(3) दूध
(4) मोदक

प्र. 6

मनी नाही भाव आणि देवा मला पाव.

(1) भीती

(2) भक्ती

(3) भाऊ

(4) प्रसाद

प्र. 7

जो जिंकेल तो पक्ष माझा.

(1) पंधरवडा

(2) बाजू

(3) पंख

(4) मासिक

प्र. 8

गोविंदरावांना पत्ते खेळण्याचा नाद आहे.

(1) आवाज

(2) छंद

(3) सवय

(4) गोडी

प्र. 9

आपले चिरंजीव सध्या कार्य करतात ?

(1) दीर्घायुषी

(2) आशीर्वाद

(3) मुलगा

(4) मुलगी

प्र. 10

वर्गातील राजूच्या तोंडाची टकळी सतत चालू असते.

(1) वटवट
(2) सूत काढण्याची चाती
(3) ध्यास
(4) अभ्या

# घटक ६...२१

# एका शब्दाचे अनेक अर्थ : उत्तर-सूची

## स्वाध्याय क्र.२

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | 2 | (6) | 2 |
| (2) | 1 | (7) | 2 |
| (3) | 2 | (8) | 2 |
| (4) | 2 | (9) | 3 |
| (5) | 3 | (10) | 1 |

E-Content Creator…
R@jgole GuruG

7588064768